# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतना च्या बाजूला, उस्मानपुरा,

पत्र पेटी क्रमांक -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६ **(P)**,२३३४७६९ **(O)**,२३४०६५८**(R)**,**Fax**-०२४०-२३५६८२०


अति तात्काळ

जा.क्र. विकाऔ/शिक्षण/२००९/४४७६
दिनाकः- १८ /१२/२००९

प्राचार्य,
शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित
पदवी आणि पदवयुत्तर अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय :- राज्यात महाराष्ट्र टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सिटी स्थापन करण्याबाबत.

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, राज्यातील अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट हे पदवी अभ्यासक्रम तसेच एमई/ एमफार्म/ एमबीए/ एमएमएस व एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम व इतर तंत्रशास्त्र अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांना एकाच विद्यापीठाअंतर्गत आणून संलग्नित करण्यास तसेच सर्व अभ्यासक्रमाची परीक्षा एकाच विद्यापीठामार्फत घेण्याच्या दृष्टीने राज्यात टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सिटी स्थापन करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे.

तरी याबाबत आपणास कळविण्यात येते की, राज्यात टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सिटी स्थापन करुन या विभागाअंतर्गत सुरु असलेल्या सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट पदवी अभ्यासक्रम तसेच एमई/एमफार्म/एमबीए/एमएमएस व एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम व इतर तंत्रशास्त्र अभ्यासक्रमाच्या परीक्षा सदर विद्यापीठामार्फत घेण्याबाबत आपले काय मत आहे,या बाबतची माहिती लेखी स्वरुपात महाराष्ट्र शासन आणि मा.संचालक तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना त्वरित सादर करावयाची आहे तरी आपले या बाबतचे मत लेखी स्वरुपात तात्काळ दि.२३/१२/२००९ पर्यत फॅक्स द्वारे व शीघ्र टपालाने सादर करावे.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रॅमर यांना माहितीस्तव कळविण्यात येते की सदर पत्र कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करावे.